# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ३०/६/२००९ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०४) इतिवृत्त

मंगळवार, दिनांक ३० जुन २००९ रोजी स्थायी समितीची सभा, माननीय सभापती(स्था.स.) **श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलीक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी ०४.०० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेला मा.आयुक्त श्री.वसंत वैद्य, प्रभारी नगर सचिव तथा उप आयुक्त(प्र.) श्री.एम.वाय.कांबळे यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
२. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
३. श्री.जावेद हसन खान
४. श्री.गवळी रविकांत काशिनाथ
५. श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
६. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
७. श्री. घडमोडे भगवान देविदास
८. श्री. पांडे विनायक प्रभाकर
९. श्रीमती मोमीन सफिया फिरदौस
१०. श्री.सुरे सिताराम इसराम
११. श्री.सोनवणे कचरू श्रीपत
१२. श्रीमती खान मेहरून्निसा हमीद खान
१३. श्री. कैसर खान बद्रोद्दीन खान
१४. श्री. प्रल्हाद निमगांवकर

**विषय क्र. २२ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये सन २००९-२०१० या वर्षीचे मुळ अंदाज स्थायी समिती समोर सादर करणे.

**संवाद :**

मा.सभापती : विषय क्रमांक 22 मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 अन्वये सन 2009-10 या वर्षाचे मुळ अंदाजपत्रक स्थायी समिती समोर मांडण्यासाठी सादर करण्यात येत आहे.

मुख्य लेखाधिकारी : महानगरपालिकेचे सन 2009-10 या वर्षाचे मुळ अंदाजपत्रक स्थायी समितीसमोर मा.आयुक्त सादर करीत आहे. तत्पुर्वी मा.आयुक्त साहेब मा.स्थायी समिती सभापती यांना पुष्पगुच्छ देवून स्वागत करतील.

(मा.सभापती यांचे पुष्पगुच्छ देवून मा.आयुक्तांनी स्वागत केले तसेच उपस्थित सर्व स.सदस्यांचे मुख्य लेखाधिकारी आणि लेखाधिकारी यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. )

मा.आयुक्त : यापुर्वी लेखानुदानाच्या 100 कोटीची मंजूरी घेतली होती. आज विस्तृत प्रमाणात अंदाजपत्रक सादर करीत आहे. मा.सभापती यांना अंदाजपत्रक सादर करीत आहे.

आज महानगरपालिकेचा सन 2009-10चा अर्थसंकल्प सादर करीत आहे. या अर्थसंकल्पामधे ज्या काही प्रमुख तरतुदी आहेत त्या सर्वप्रथम सभागृहाच्या निर्देशनास आणतो, महानगरपालिकेला उत्पन्नाच्या बाबतीत 2009-10मध्ये एकुण शासकीय अनुदान अपेक्षीत आहे त्याचा उल्लेख केलेला आहे समांतर जलवाहिनीसाठी 143.86 कोटी अनुदानाचे पत्र प्राप्त झालेले आहे. सुजल निर्मल योजनेसाठी 40 कोटी मंजूर झालेले आहे त्यातील शासनाचा 28 कोटी रूपयांचा हिस्सा आहे. महसुली बीगर शेती अनुदान 10 कोटीचे अपेक्षीत आहे. वित्त आयोगाकडुन 15.50 कोटीचे अनुदान अपेक्षीत आहे. विशेष शासकीय अनुदानाचे 5 कोटी अपेक्षीत आहे. शिक्षण विभागाचे वेतन अनुदान 3 कोटींचे आहे. आरोग्य विभागाचे वेतन अनुदान 5 कोटींचे अपेक्षीत आहे. रस्ते बांधणी अनुदान 3 कोटी 50 लाखाचे अपेक्षीत आहे. इतर अनुदान 11.20 अपेक्षीत आहे. असे एकुण 224.88 कोटीचे शासकीय अनुदान अपेक्षीत आहे. त्यातील 143.86 आणि 28 कोटींचे प्रत्यक्ष पत्रही प्राप्त झालेले आहे. महसुली उत्पन्न महापालिकेचे दाखविले आहे ते आपण 259.08 कोटींचे दाखविले आहे. जकात करापासुन 125 कोटी रूपये मालमत्ता कर 40 कोटी पाणीपट्टी 40 कोटी अपेक्षीत आहे. 104 कोटींची दोन्ही मिळुन थकबाकी आणि चालू रकमेची वसुली करायची आहे. त्यापैकी 80 कोटी वसुली अपेक्षीत धरलेली आहे. नगररचना विभागाकडुन 15 कोटींचे उत्पन्न अपेक्षीत आहे. मालमत्ता विभाग 3 कोटी रूपये इतर महसुली विभाग 37.8 कोटी रूपये अपेक्षीत आहे. 494 कोटी रूपयांची बजेटची रक्कम दाखविण्यात आली आहे. खर्चाच्या ज्या प्रमुख तरतुदी दाखविण्यात आलेल्या आहे भुसंपादनासाठी ज्या काही योजना आखलेल्या आहेत विशेषत:रस्त्यांचे रूंदिकरण आहे आणि अतिक्रमणही काढली आहे जागा ताब्यात घेतली आहे आणि काही विषय न्यायालयाचे आहेत. डिपी मधील भुसंपादन करणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी आपण 13.50 कोटी रूपये ठेवण्यात आलेले आहे. तरतुद 10 कोटींची ठेवण्यात आली आहे. सराफा रोडसाठी 2.50 कोटी रूपये आहे. एमजीएम ते लक्ष्मणचावडी रोडसाठी 2.50 कोटी रूपये आहे. रोशनगेट ते आझाद चौक येथे 1.72 कोटी रूपये अपेक्षीत आहे. हर्सुल सर्वे नंबर 192/5 मधील रस्त्यांसाठी 2.50 कोटींची तरतुद आहे. जिन्सी ते रोशनगेट 1.15 कोटी रूपये आहे. रहीमा मस्जिद बारी कॉलनी 1.1 कोटी आहे. मुख्य पोस्ट ऑफिस ते जुनाबाजार 0.55 कोटी रूपये आहे. पैठणगेट ते क्रांती चौक

2.50 कोटी रूपये आहे. या प्रकारे 13.50 चा खर्च अपेक्षीत आहे. त्यापैकी 10 कोटींची तरतुद केलेली आहे.

श्री.विनायक पांडे : यामध्ये एक मुख्य रस्ता राहुन जातोय तो म्हणजे महात्मा फुले पुतळा ते बाराभाई ताजीया यासाठीही 1 कोटीची तरतुद ठेवण्यात यावी.

मा.आयुक्त : समांतर जलवाहीनीसाठी केंद्र शासनाने 143.86 कोटी मंजूर केलेले आहे राज्य शासनाचा 30 टक्के आणि महानगरपालिकेचा 10 टक्के वाटा आहे यासाठी सन 2009-10 च्या योजनेसाठी 8 कोटींची तरतुद ठेवण्यात आली आहे. 143 कोटींचे अनुदान मिळालेले आहे त्यातील 14 कोटी रूपयांचा हिस्सा ठेवणे अपेक्षीत आहे. सर्व प्रोसेसिंग होवून या वर्षात किती काम होईल आणि त्यासाठी किती शेअर टाकावे लागतील हे गृहित धरून सदरील तरतुद ठेवण्यात आली आहे. 40 कोटी रूपये शासनाने मंजूर केलेले आहे त्यातील 28 कोटी रूपये शासनाचा हिस्सा होता आणि 4 कोटी रूपये वेगळे अकाऊंट काढुन ठेवण्यास शासनाने कळविले होते. त्यानुसार 4 कोटी खर्चाची तरतुद ठेवण्यात आली आहे. विविध निधी महानगरपालिकेत ठेवावे लागतात 25 लक्ष वेतन राखीव निधी पेंन्शन निधी 50 लक्ष वृक्ष अनुदान निधी 50 लक्ष आणि मनपा निधी 1 कोटी रूपये अशा प्रकारचे ठेवलेले आहे. विविध विकास कामासाठी एकुण 60 कोटी रूपये यामध्ये स्पिल ओव्हर कामांचा समावेश आहे या संदर्भात सभागृहाला नम्र निवेदन करायचे आहे जुलै महिणा सुरू झालेला आहे जे कामे समाविष्ट केलेली आहे त्याचा एकंदर खर्च किती पडेल याचा प्रत्यक्ष अंदाजित खर्चाचा आढावा शहर अभियंता आणि त्यांचे सहकारी यांच्याबरोबर बसून घेतलेला आहे. त्यानुसार अंदाजित खर्च अपेक्षीत धरून त्याप्रमाणे खर्चाची तरतुद ठेवलेली आहे. एम. अँड आर.मध्ये (Maintenance & Repairs )सर्व वार्डासाठी 20 कोटींची तरतुद ठेवण्यात आली आहे. अशा प्रकारे एकुण 80 कोटी रूपये दोन्ही मिळुन तरतुद करण्यात आली. जलवाहिन्यासाठी पाणीपुरठयासाठी साधारणत: 195 कोटी अपेक्षीत आहे ते विकासकामांमध्ये घेण्यात आलेले आहे.

श्री.रविकांत गवळी : एसटीपीसाठी शासनाकडुन 30 कोटी रूपये मिळणार आहे. याची तरतुद महानगरपालिकेने करणे गरजेचे आहे.

मा.आयुक्त : याबाबतीत मागील सर्वसाधारण सभेमध्ये चर्चा झाली होती एसटीपीचा फेर प्रस्ताव सादर करा ते मान्य झाल्यास घेण्यात येईल व अनुदान ठेवण्यात येईल.

श्री.विनायक पांडे : शासनाचा जो येणारा निधी आहे तो परत जावू नये अशी इच्छा सर्व सदस्यांची आहे.

श्री.प्रशांत देसरडा : सदरील बजेट वाचण्यास पुर्णपणे वेळ मिळावा व प्रशासनाने काय सादर केले हे कळण्यासाठी वेळ मिळावा म्हणुन दोन तिन दिवसांचा अवधी द्यावा आणि मग सविस्तर चर्चा सभागृहात घडुन आणावी. प्रशासन बजेट सादर करतांना जी ॲक्ट प्रमाणे प्रोसेस आहे की, प्रभाग समितीच्या बैठकी झाल्या पाहिजेत आणि प्रभाग समितीने बजेट सादर केला पाहिजे तरच प्रभाग समित्या सक्षम होतील. प्रशासनाने कुठेच प्रभाग समितीची बैठक न घेता

बजेट ठेवलेले आहे. सभापतींच्या नुसत्या सहया घेवुन बजेट सादर न करता प्रभाग समितीच्या माध्यमातून बजेट ठेवयला पाहिजे. सर्व सदस्यांच्या वतीने विनंती करण्यात येते की, बजेटचा अभ्यास करण्यासाठी वेळ देण्यात यावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : सर्व वार्डामध्ये कमीत कमी आणि जास्तीत जास्त किती खर्च केला याचा तपशिल देण्यात यावा.

श्रीमती मेहरून्निसा खान : ज्या वार्डामध्ये कामाची आवश्यकता नाही तिथे काम करण्यात आलेले आहे.

मा.आयुक्त : स.सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहे ते चर्चेला येतील अशी माझी अपेक्षा आहे. वार्डनिहाय कामांची यादी देण्यात आली आहे. गेल्या वर्षीचीही यादी आहे, खर्च किती झाला याबाबतही माहिती आहे. चालू वर्षी एम.अँड आर.ची तरतुद करतांना कुठल्या आधारे तरतुद केली आहे याचा बारकाईने अभ्यास केलेला आहे. ज्यावेळी चर्चा होईल त्यावेळेस माहिती सादर करण्यात येईल.

श्रीमती मोमीन सफिया : औरंगाबाद महानगरपालिकेत एकुण 99 वार्ड आहेत त्यातील 35 महिला वार्ड आहे महिला वार्डात कुठलेच डेव्हलपमेंट झालेले नाही. त्यामुळे महिला वार्डासाठी जास्तीत जास्त तरतुद ठेवण्यात यावी.

श्री.कचरू सोनवणे : गेल्या बजेटमध्ये आणि चालू बजेटमध्ये माझ्या वार्डासाठी कुठलीच तरतुद ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे वार्डाची परिस्थिती अतिशय बिकट झालेली आहे. गेल्या तिन वर्षात विकासाची कुठलीच कामे वार्डात होत नाही.

मा.आयुक्त : मा.सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहे त्याची तपासणी निश्चित करण्यात येईल.

मा.सभापती : याबाबतीत मा.शहर अभियंता यांनी लक्ष द्यावे.

श्रीमती मेहरून्निसा खान : गेल्या अडिच वर्षापासुन ब्रिजची संचिका आहे ती आहे त्या अवस्थेत आहे

श्री.भगवान घडमोडे : स.सदस्य विकास कामाबाबत बोलत आहे बजेटबुक फुटलेले आहे काय?

मा.आयुक्त : सभागृहात आत्ताच स.सदस्यांना बजेट बुक देण्यात आलेले आहे.

मा.सभापती : मा.आयुक्तांनी स्थायी समिती समोर सन 2009-10चे बजेट सादर केलेले आहे. याबाबत सर्व स्थायी समितीच्या सदस्यांना विश्वासात घेवून चर्चा करून आणि प्रशासनाशी चर्चा करून याबाबत योग्य ते निर्णय घेवून लवकरच पुढील स्थायी समितीमध्ये याबाबत सविस्तर चर्चा करून बजेटचे निर्णय स्थायी समितीत घेवू.

**ठराव :**

सभागृहात सादर करण्यात आलेल्या सन 2009-10 चे अर्थसंकल्पावर विचार विनिमय करण्यासाठी स्थायी समिती सभेचे आयोजन करून निर्णय घेण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद